विस्तार पत्रिका क्र. 12/2016

## दुधाळ जनावरांतील

# कासदाह (मस्टायटीस)

## आजार




भाकृअनुप ICAR

भाकृअनुप - केंद्रीय तटीय कृषि अनुसंधान संस्थान
ICAR-Central Coastal Agricultural Research Institute

# कृषि विज्ञान केन्द्र


भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

ओल्ड गोवा

# दुधाळ जनावरांतील कासदाह / स्तनदाह (मस्टायटीस ) आजार

दुग्धव्यवसायामध्ये स्वच्छतेचे अनन्यसाधारण महत्व आहे. दुग्धव्यवसाय फायदेशीर राहण्यासाठी त्रिसूत्रि स्वच्छतेची अत्यंत गरज आहे. त्यामध्ये दूध काढणारी व्यक्ति, दुधाळ जनावर व जनावंरा सभोवतालचे वातावरण ( गोठा) या तीन गोष्टी सदैव स्वच्छ असल्या पाहिजेत. तिन्ही गोष्टीपैकी कोणत्याही एकामध्ये , दोन किंवा तीन गोष्टीमध्ये विसंगती झाल्यास दुधाळ जनावरामध्ये कासदाह आजार होतो.

कासदाह आजार दुधाळ गायी, म्हशी, शेळया या प्राण्यात सर्वसामान्यपणे आढळतो. जास्त दूध देणाऱ्या संकरीत गायी व म्हशीमध्ये या आजाराचे प्रमाण जास्त असून शेळयामेंढयामध्ये याचे प्रमाण कमी असते. या आजारामध्ये जनावरे दगावत नाहीत परंतु जनावरांच्या दुग्धउत्पादन क्षमतेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. या आजारामध्ये एकतर जनावरांचे दुग्धोत्पादन घटते (70 % नुकसान) तसेच आजाराच्या उपचारामध्ये दूध काढून फेकून द्यावे लागते ( 9 % नुकसान) , उपचारासाठी औषधावरील खर्च (7 % नुकसान) जास्त असतो व बऱ्याचदा आजाराची तीव्रता जास्त असल्यास अशी जनावरे उपचाराला प्रतिसाद देत नाहीत व नाईलाजाने जनावरे कमी किंमतीत विकावी लागतात ( 14 % नुकसान). या आजारामुळे जनावरांत एखादे सड निकामी झाल्यास त्या जनावरांची 25 % रक्कम बुडाली असे समजावे.

कासदाह झालेल्या जनावरांपासून काढलेले दूध पिणे माणसास हानिकारक आहे यामुळे घश्याचा दाह , जुलाब , क्षयरोग व ब्रुसेल्लोसिस सारखे आजार होवू शकतात.

## आजाराची कारणे:

1. सूक्ष्मजंतु :

अ) जिवाणू : हा आजार प्रामुख्याने जीवाणूमुळे होतो. ( स्ट्रेप्टोकोक्कॉय , स्टयाफायलोकोक्कॉय , ई.कोलॉय , सिडोमोनास , कोरेनिबॅक्टीरिया, ब्रुसेल्ला, लेप्टोस्पॉयरा , क्लेबीसेल्ला ई. )

आ) विषाणू : काही विषाणूजन्य आजारामध्ये दुय्यम स्वरूपाचा आजार म्हणून कासदाह होतो.( लाळया खूरकुत (फूट अँड माऊथ डीसीज ) व देवी ( पाक्स )




इ) बुरशी (फंगस) : काही बुरशीजन्य सूक्ष्मजंतुमुळे कासदाह आजार होतो. (क्रिप्टोकोक्कस, अस्परजिल्लस , कॅनडिडा सारखे )




2. सडास किंवा कासेस इजा होणे : वासरू दूध पितांना सडास जास्त जोर लावणे किंवा चावणे, सडास किंवा कासेस मार लागणे, अस्वच्छ व खडबडीत गोठ्यामुळे कास व स्तन यांना जखम होणे अशा एक किंवा अनेक

कारणामुळे सडास व कासेस इजा होवून तद्नंतर सूक्ष्मजीवांचा सडामध्ये शिरकाव झाल्यास हा आजार होवू शकतो.

3. दूध काढण्याची पद्धत : अंगठा लावून दूध काढणे ही चुकीची पद्धत आहे. त्यामुळे सडामध्ये अंतर्गत इजा पोहचू शकते.

4. दूध पूर्णपणे न काढल्यास कासदाह होऊ शकतो.

4 .अस्वच्छता :

अ) दूध काढणारी व्यक्ति : दूध काढणारी व्यक्ति स्वच्छ नसेल तर , बोटाची नखे वाढलेली, तंबाकू खाण्याची सवय व हात न धुताच दूध काढण्याची सवय , अंगावरील अस्वच्छ कपडे ही सर्व कारणे कासदाह आजार होण्यास कारणीभूत ठरतात.

ब) दुधाळ जनावरांची अस्वच्छता: दूध काढण्यापूर्वी जनावरांचे मुख्यता: शेणाने भरलेला शरीराचा मागचा भाग (शेपूट, पाय तसेच कास व सडे ) स्वच्छपणे धुवून घ्यावीत, असे न केल्यास कासदाह होवू शकतो.

क) गोठ्याची अस्वच्छता: गोठ्यातुन मलमूत्र वेळोवेळी न काढणे, नाल्यामध्ये मलमूत्र बराच वेळ अडकून राहणे किंवा नाली व्यवस्थित वाहण्याची सोय नसणे, गोठ्यात सूर्यप्रकाश व्यवस्थित न पडणे , गोठ्यात हवा खेळती न राहणे या सर्व गोष्टी कासदाह आजार होण्यास कारणीभूत ठरतात. यामुळे मुक्तसंचार पद्धतीमधील जनावरामध्ये बंधीस्त पद्धती मधील जनावरांपेक्षा कासदाह आजार होण्याचे प्रमाण कमी असते.

5. खाद्य घटकाची कमतरता : खाद्यामध्ये सेलेनियम क्षाराची व जीवनसत्व "इ" ची कमतरता या कारणामुळे कासदाह होवू शकतो.

## मुळात कासदाह आजार कसा होतो ?

कासदाह आजार बहुतांशी अधिक दूध देणाऱ्या गायी म्हशीमध्ये आढळणारा आजार आहे. दुधाळ जनावरें त्यांचे दूध काढणे झाल्यानंतर विश्रांतीसाठी किंवा थकवा दूर करण्यासाठी लगेच किंवा थोड्या वेळाने जमिनीवर बसतात. दुधाळ जनावरांमध्ये दूध काढल्यानंतर सडाची छिद्रे अर्धा ते एक तास उघडी असतात किंवा पूर्णपणे बंद होत नाहीत आणि या अवधीत जर जनावरे जमिनीवर बसल्यास व गोठा अस्वच्छ असेल तर कासदाह आजारासाठी कारणीभूत असलेले सुक्ष्मजंतु सडाच्या छिद्रावाटे कासेमध्ये जावून कासदाह आजार करतात.

या आजारामध्ये दुग्धपेशी बऱ्याच प्रमाणात नाश पावतात, परिणामी दुग्धोत्पादन घटते. वेळेवर उपचार चालू न केल्यास कासेतील पेशी तंतुमय होवून एक किंवा जास्त सडे निकामी होवू शकतात.आजाराची तीव्रता जास्त असेल तर चारही सडे बंद होवून दुधाळ जनावरे पुर्णपणे अनुत्पादक होवू शकतात.

## लक्षणे:

कासदाह आजाराचे लक्षणावरून दोन प्रकारामध्ये विभागणी करता येतो.

1. सुप्त कासदाह व
2. दृष्य कासदाह

सुप्त कासदाह: या प्रकारात खालील लक्षणे दिसतात.

अ. या प्रकारात जनावरांचे दूध वरकरणी चांगले दिसते.

आ. दुधात गाठी , रक्त, पू आढळत नाही.

इ. कासेची ठेव ही सामान्य जनावरांसारखीच असते.


ई. या आजारात दूधातील पांढऱ्या पेशींची संख्या वाढलेली असते.

उ. दिवसेंदिवस सरासरी दूधाचे प्रमाण घटत राहते.

दृष्य कासदाह : या प्रकारात खालील लक्षणे दिसतात.

1. कासेमध्ये बदल झालेला दिसतो.
2. आजार अतितिव्र स्वरूपाचा असेल तर जनावराला ताप येतो.
3. अशी जनावरे चारा-पाणी घेणे कमी करतात.
4. कास सुजलेली व लालसर रंगाची बनते.
5. कासेला हाताने स्पर्श केल्यास कासेचा भाग गरम लागतो व जनावराला त्रास होतो.
6. अशी जनावरे अस्वस्थ बनतात व दूध काढताना लाथ मारतात.
7. या आजारात दूध खराब होते. दुधामध्ये रक्त, पु सारखे घट्ट गाठी आढळतात.

जुनाट कासदाह आजारामध्ये जनावरे उपचाराला प्रतिसाद देत नाहीत, यामुळे कास पुर्णपणे निकामी होते. कासेतून दूध येत नाही व कास आकुंचलेली असून दगडासारखी ठणक बनलेली असते.



कॅलिफोर्निया कासदाह चाचणी

## आजाराचे निदान:

1. आजाराच्या लक्षणावरून निदान करता येते.

2. दूधातील रोगजंतूंचे " सूक्ष्मदर्शक " यंत्राखाली परीक्षण केल्यावर निदान करता येते.

3. सुप्त कासदाह लक्षणावरून निदान करणे अवघड होते यामुळे गोठ्यातच दूधाची तपासणी करता यावी यासाठी सोपी व सरळ " कॅलिफोर्निया कासदाह चाचणी " वापरावे .

4. स्ट्रिप कप चाचणी : या चाचणीत सपाट काळया रंगाच्या धातूचा किंवा प्लॅस्टिकचा कप घ्यावा . त्या कपात दूध काढताना सुरूवातीच्या 1-2 धारा काढाव्यात जेणेकरून तळाला पातळ थर तयार होईल .नंतर काळजीपूर्वक बघितल्यास दुधातील रंगामधील बदल, गाठी यावरून कासदाह आजाराचे निदान करता येते.

5. घरच्या घरी निदान करण्याची सोपी पद्धत : एका कपावर काळा कपडा गुंडाळावा व दुधाची धार काढताना प्रत्येक सडातील धार त्यावर मारावे. कपड्यावर गुठळया दिसून आल्यास रोगाची सुरुवात आहे असे समजावे.

## आजाराचे उपचार :

कासदाह आजाराची लक्षणे दिसल्यास लगेचच तज्ञ् पशूवैद्यकाच्या सल्ल्यानुसार तात्काळ उपचार चालू करावे.

1. कधीही कासेवरील जखमाकडे दुर्लक्ष न करता लगेचच अशा जखमा जंतुनाशक द्रावणाने (डेटॉल, सॅवलॉन ,आयोडीन ई.) स्वच्छ करावे.

2. कासेतील खराब दूध पूर्णपणे निघत नसेल तर मिल्क सायपन या पोकळ नळीने काढावे. कास पुर्णपणे रिकामी झाल्यानंतर प्रतिजैवकाची ट्यूब सडामध्ये हळुवार सोडावी.

3. बऱ्याचदा जनावरे उपचाराला प्रतिसाद देत नाहीत त्यासाठी कासदाह झालेल्या जनावराचे दूध प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावे. तेथे "अँटीबायोटीक सेनसीटीवीटी टेस्ट " ही चाचणी करतात. या चाचणीद्वारे योग्य प्रतिजैवक जे की आजारामध्ये प्रभावशाली काम करू शकेल हे समजते. त्याच्यानंतर अशी प्रतिजैवक औषधे आजारी जनावरांमध्ये 5 दिवस द्यावीत.

4. वेदनाशामक औषधे , अँटीहिस्टॅमीनीक औषधे 4 – 5 दिवस द्यावीत.

5. कासेवरील सूज कमी करण्यासाठी काही मलम (म्यॅस्टीलेप) बाजारात उपलब्ध आहेत , अशा मलमाचा वापर करावा.

## प्रतिबंधक उपाय व काळजी :

1. जनावरे , दूध काढणारी व्यक्ति व गोठा सदैव स्वच्छ असावे.

2. जनावरे गाभण असताना विण्याच्या सुमारे 60 दिवस अगोदर प्रत्येक सडामद्धे एक या प्रमाणे कासदाह प्रतिबंधक प्रतिजैवकाची ट्यूब सोडावी.

3. दूध काढण्यापूर्वी कास स्वछ धुवावी व पुसून घ्यावी. दूध काढण्यासाठी पूर्णमूठ पद्धत वापरावी.गायीने पान्हा सोडल्यावर लगेचच दूध काढावे व कास पुर्णपणे रिकामी करावी.

4. दुधाची वेळ कटाक्षाने पाळावी.

5. प्रथम निरोगी जनावरांचे दूध काढावे व त्यानंतर आजारी जनावरांचे दूध काढावे.

6. दुधाळ जनावरांना रोज 50 ग्रॅम खनिजमिश्रण द्यावे.

7. उपचाराला प्रतिसाद न देणारी व जुनाट कासदाह असलेली जनावरे कळपातून कमी करावे.

8. टिट डिप कप पद्धत : दुधाळ जनावरांमध्ये कासदाह आजार होवू नये यासाठी स्वच्छतेसोबत टिट डिप कप पद्धत फारच उपयोगी आहे. या पद्धतीत एक प्लॅस्टिकचा कप व त्याला आयोडीनचे द्रावण असलेले प्लॅस्टिक बॉटल जोडलेले असते.प्रत्येक वेळेस दूध काढल्यानंतर चारही सडे टिट डिप कप मध्ये बुडवून घ्यावीत जेणेकरून सडाच्या उघड्या छिद्रामध्ये आयोडीनचे द्रावण भरले जाईल परिणामी कासदाह आजारासाठी कारणीभूत असलेल्या जंतूचा सडामधील शिरकाव थांबेल.

9. दररोज प्रत्येक वेळेस दूध काढल्यानंतर जनावरांना अर्धा ते एक तास उभेच ठेवावे यासाठी जनावरांना दूध काढल्यानंतर पेंड किंवा वैरण द्यावे किंवा चरावयास सोडावे जेणेकरून जनावरे जमिनीवर खाली बसणार नाहीत.

अशा एक किंवा अनेक बाबींचा शेतकऱ्यांनी काळजी घेतली तर जनावरांना कासदाह आजार होण्यापासून रोखू शकतो.




प्रकाशक :
**प्रो. नरेंद्र प्रताप सिंह**
निर्देशक, भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र, ओल्ड-गोवा

संपादक :
**श्री. एच. आर. सी. प्रभु**
कार्यक्रम समन्वयक

लेखन :
**डॉ. संजयकुमार विठ्ठलराव उद्धरवार**
विषयतज्ञ (पशु विज्ञान)

**डॉ. एकनाथ भा. चाकूरकर**
मुख्य शास्त्रज्ञ (पशू विज्ञान)

तकनीकी सहायक :
**श्री. विश्वजीत प्रजापती**
कार्यक्रम सहायक (कम्प्युटर)

**कृषि विज्ञान केंद्र**
**भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र**
**जुने गोवें, गोवा - 403 402**
**फोन : 0832-2285475**
**ई-मेल : pckvknorthgoa@gmail.com**
**वैबसाइट : www.kvkicarrcgoa.in**